# पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.

---

प्रेसनोट

## पीएमपीएमएल कडून रक्षाबंधनानिमित्त करण्यात आलेल्या जादा बसेस नियोजनास प्रवाशांचा चांगला प्रतिसाद

पुणे महानगर परिवहन महामंडळाकडून पुणे, पिंपरी-चिंचवड शहरांसह पी.एम.आर.डी.ए. हद्दीत बससेवा पुरविण्यात येते. रक्षाबंधन सणानिमित्त प्रवाशांची वाढती गर्दी लक्षात घेता दरवर्षी प्रमाणे प्रवाशांच्या सोयीसाठी पीएमपीएमएल कडून दि. १९ व २० ऑगस्ट २०२४ रोजी नियोजित १६९२ शेड्युल व्यतिरिक्त १३० जादा बसेसचे नियोजन करून एकूण १८२२ बसेस गर्दीच्या मार्गांवर उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या.

याकरिता पुणे महानगर परिवहन महामंडळाकडील वाहक, चालक, पर्यवेक्षकीय सेवक यांच्या साप्ताहिक सुट्ट्या रद्द करण्यात आलेल्या होत्या. त्याबरोबर महत्वाच्या स्थानकांवर बस संचलन नियंत्रणासाठी परिवहन महामंडळाकडील अधिकारी, लिपीक सेवक व इतर कर्मचारी यांची महत्वाच्या स्थानकांवर व थांब्यांवर प्रवाशांना मार्गदर्शन करणेकामी व वाहतूक नियंत्रण करणेकामी नेमणूक करण्यात आली होती. पीएमपीएमएलच्या बससेवेला दि. १९ व २० ऑगस्ट २०२४ रोजी प्रवाशांचा चांगला प्रतिसाद मिळाला.

**दि. १९ व २० ऑगस्ट २०२४ रोजीची प्रवाशी संख्या व प्राप्त उत्पन्न खालीलप्रमाणे**

| अ.क्र. | दिनांक | मार्गावरील उपलब्ध बससंख्या | प्रवाशी संख्या | प्राप्त उत्पन्न (रुपयात) |
|---|---|---|---|---|
| १ | १९/०८/२०२४ | १,८२२ | १३,१८,९६९ | १,८९,१०,९०२/- |
| २ | २०/०८/२०२४ | १,७६६ | १४,१४,४९९ | २,०५,८९,८९१/- |

रक्षाबंधन सणानिमित्त विशेषतः महिला प्रवाशांनी पीएमपीएमएल च्या बससेवेचा जास्तीत जास्त लाभ घेतला. पीएमपीएमएल च्या बससेवेला असाच प्रतिसाद द्यावा असे आवाहन परिवहन महामंडळाकडून करण्यात येत आहे.

Sd/-
चिफ ट्रान्सपोर्ट मॅनेजर (ऑपरेशन)
पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.

---

दि. २१/०८/२०२४

मा. संपादक,
दैनिक ..........
यांजकडेस...

महोदय,

वरील प्रेसनोट नागरिकांच्या माहितीसाठी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिद्ध होणेविषयी विनंती आहे.

मा. स. कळावे.

sd/-
कामगार व जनता संपर्क अधिकारी
पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.